# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

वाळू/रेती घाट निर्गतीकरीता ई-टेंडरींग कम् ई-ऑक्शन लिलाव (ई-निविदा सह ई-लिलाव)

## वाळू लिलाव (व्दीतीय फेरी)

अहमदनगर जिल्हयातील रेती घाट लिलाव सन 2018-19 करीता दिनांक 30 सप्टेंबर 2019 पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदेसह ई-लिलाव **राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती (SEAC1)** व **राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA)** यांचे कडील मान्यतेमधील अटी व शर्तीला अधीन राहुन ई-निविदा सह ई-लिलाव द्वारे रेती/वाळूची निर्गती करणेसाठी सविस्तर माहिती **http://ahmednagarco.abcprocure.com** या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करणेत आली आहे. इच्छुक निविदाधारकांना जिल्हयातील रेती घाटांच्या ई-निविदा सह ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घ्यावा.

ई-निविदा व ई-लिलावासाठी अहमदनगर जिल्हयाकरीता मे.आयसीआयसीआय बँक या संस्थेची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर संस्थेचा पत्ता मे.आय.सी.आय.सी.आय. बँक, ए विंग, अंबर प्लाझा, सहकार सभागृहासमोर, एसटी स्टॅन्ड जवळ, अहमदनगर. इच्छुक निविदाधारकांनी ई-निविदा सह ई-लिलाव विषयक तांत्रिक व सविस्तर माहिती घेणेकामी संस्थेचे संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक (+91-241) 245 1862, +91-97655 67728, Fax (+91-241) 245 1864, Email:sale@abcprocure.com किंवा support@abcprocure.com वर संपर्क साधण्यात यावा.

**ई-निविदा व ई-लिलावामध्ये भाग घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :-** ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन नोंदणीसाठी खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

१) ई-मेल आयडी, २) पॅन कार्ड,३) आधार कार्ड, ४) रहिवास प्रमाणपत्र ,

५) टॅन नंबर (कंपनी असल्यास), 6) जीएसटी नंबर 7) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्रे ( सन 2015-2016, 2016-2017 2017-18) 8) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र, 9) अधिकृत संस्थेकडील डिजीटल सिग्नेचर (डिजिटल की)

**ना परतावा शुल्क फी (Fee):-**

ई-निविदा सह ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील.

१) नोंदणी फी (फक्त एकदाच) - रु.२८०९/-

२) निविदा फॉर्म फी (प्रत्येक वाळूस्थळाकरीता स्वतंत्र) - रु.२०००/- ( अपसेट प्राईस दहा लाखापर्यंत असणा-या वाळुस्थळासाठी ) रुपये ५०००/- ( अपसेट प्राईस दहा लाखापेक्षा जास्त असणा-या वाळुस्थळासाठी)

३) निविदा प्रक्रिया फी (प्रत्येक वाळूस्थळाकरीता स्वतंत्र) - रु.१५००/- सदरहू रक्कम नेट बँकिंग/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने अदा करावी लागेल.

<u>अनामत रक्कम</u>:- ज्या वाळू/रेतीघाटासाठी ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे, त्यासाठी अनामत रक्कम म्हणुन रु.3,00,000/-(रुपये तीन लक्ष फक्त ) किंवा अपसेट प्राईसच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणुन वर नमूद पध्दतीचा अवलंब करून जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे ठरवून दिलेल्या खात्यावर जमा करावी लागेल. ज्या व्यक्ती / संस्था ज्या वाळुस्थळाकरीता ई-निविदा भरेल ,अशाच व्यक्ती / संस्थाना ई-लिलावामध्ये भाग घेता येईल. ई- निविदा ही ई-लिलाव झाल्यानंतरच खुली करण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच ई- निविदा ही ई-लिलाव यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक बोली असलेल्या त्या ठेकेदारांस वाळू लिलाव मंजूर करण्यात येईल.

**प्रमुख अट** - वाळू उत्खननामुळे होणा-या प्रदुषणाबाबतची प्रचलित शास्त्रिय मोजमाप करणे व त्यावर नियंत्रण ठेवणेची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लिलावधारक यांची राहील.

टिप- वाळू/रेतीघाट संबधि सिस्तृत माहिती संबधित http://www.**ahmednagar.nic.in** या वेबसाईट / संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | वाळूस्थळाचे नांव | नदीचे नाव | लिलावास उपलब्ध होउ शकणारा वाळूसाठा ब्रास | 1/10/018 ते 30/09/2019 या कालावधीचे लिलावासाठी निर्धारीत रक्कम रुपये 3516/- |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | राहुरी | चिंचविहाण | मुळा | 5663 | 19911108 |
| 2 | जामखेड | आघी क्र.1 | सिना | 1599 | 4825782 |
| 3 | | आघी क्र.2 | सिना | 1253 | 4405548 |
| 4 | शेवगांव | खरडगांव | नांदणी | 1767 | 6212772 |
| 5 | | मलकापूर | ढोरा | 719 | 2528004 |

वर नमुद भूखंडामधून वाळू उत्खनन व वाहतूक करण्यासाठी शासनाने दि.03 जानेवारी 2018 च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार 3000 ब्रास पर्यंत वाळू उत्खनन व वाहतूक करण्यासाठी 3 महिने, 4500 ब्रास पर्यंत वाळू उत्खनन व वाहतूकीसाठी 4.5 महिने, 6000 ब्रास पर्यंत वाळू उत्खनन व वाहतूकीसाठी 6 महिने व 6000 ब्रास पेक्षा जास्त वाळू उत्खनन व वाहतूकीसाठी 30 सप्टेंबर इतका कालावधी राहील. मात्र वरील कालावधी कितीही असला तरी अखेरची मुदत 30 सप्टेंबर 2019 राहील.

<u>जिल्हयातील रेती घाटांच्या ई-निविदेसह ई-लिलाव, वेळापत्रक</u>

| कालावधी | तपशिल |
|---|---|
| **दि. 15/03/2019 सकाळी 11.०० पासून ते दि.31/03/2019 सायंकाळी 5 पर्यंत** | **रजिस्ट्रेशन, निविदा खरेदी करणे व सादर करणे.** |
| दि.02/04/2019 स.11.00 ते दु.3.00 वाजेपर्यंत ई - लिलाव | 5 वाळू भूखडांचे ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा सह ई-लिलाव ई-लिलाव दुपारी 3 वा. बंद करण्यात येतील. तदनंतर ई-निविदा उघडणे व त्यामध्ये सर्वोच्च किंमतीचा वाळू भूखंड निश्चित करणे. |

उपरोक्त वाळु /रेती घाटांचे ई-निविदासह ई-लिलाव हे एखाद्या विशिष्ट अगर सर्व वाळु / रेती घाटांची ई-निविदासह ई-लिलाव प्रक्रिया स्थगित अगर रद्द करण्याची तसेच प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्याचा कालावधी वाढविणेबाबतचे अधिकार अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी हे राखुन ठेवीत आहेत.

(पी. एल. सोरमारे)
अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर

क्र.गौख/कार्या४क/480/2019
अहमदनगर दिनांक 14/03/2019